
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
ERNATIONAL MULTIDISCIPLINARY
RTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X, Issue - II
April - June - 2021
English /
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

ENGLISH / MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | प्राथमिक शिक्षण : समस्या आणि उपाय<br>**विजय लिंबाजीराव कोल्हे** | ६७-७३ |
| १३ | ग्रामीण कवितेचा नवा आयाम : 'जहर खाऊ नका'<br>**मनिषा नामदेवराव दिघडे** | ७४-७८ |
| १४ | मराठवाड्यातील इयत्ता १२वी कला शाखेतील विद्यार्थ्यांची बुध्दीमत्ता आणि शैक्षणिक संपादनुक अभ्यासणे आणि तुलनात्मक अभ्यास करणे<br>**रेखा पुंजाराम बोर्डे** | ७९-८२ |
| १५ | मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात महाराणी ताराबाईचे योगदान<br>**Annie Sumant Nalla** | ८३-८६ |
| १६ | डेक्कन एज्युकेशन सोसायटी द्वारे स्वातंत्र्या नंतर (सन १९४७ नंतर) दिल्या जाणाऱ्या क्रीडा सुविधा<br>**श्री. गौतम सोनवणे**<br>**डॉ. सुदाम शेळके** | ८७-९२ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार आणि कार्ये<br>**जॉकी पीटर घुले** | ९३-९९ |
| १८ | भारतीय आदिवासींच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान<br>**प्रा. डॉ. साईनाथ शेटोड** | १००-१०३ |
| १९ | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीशिक्षणातील योगदान-एक अभ्यास<br>**वर्षा सुदाम त्रिभुवन** | १०४-१०७ |
| २० | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ५+३+३+४ आकृतीबंधाचा एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. रेखा पाठक** | १०८-११३ |
| २१ | दलित कवयित्रींच्या कवितेतील मुक्तछंद प्रतिमासृष्टी आणि मिथके<br>**डॉ. छाया हरिभाऊ कदम-पवार** | ११४-१२० |
| २२ | कोविड-१९ चे असंगटीत क्षेत्रातील रोजगारावरील परिणाम<br>**प्रा. निहार अ. बोदेले** | १२१-१२६ |
| २३ | दलित कादंबरीतील जोगतिणीचे चित्रण<br>**डॉ. मनमोहन राजे** | १२७-१३१ |

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २३. दलित कादंबरीतील जोगतिणीचे चित्रण

**डॉ. मनमोहन राजे**
शिवराज कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड डी.एस.कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

१९२० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांची चळवळ चालवू लागले, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेचा बीमोड करणे, दलितांना नवजीवन देणे हे त्यांच्या चळवळीचे मुख्य हेतू होते. अशा चळवळीमधूनच दलित साहित्याचा जन्म झाला. गावकुसाबाहेरील दलितांवर अन्याय अत्याचार होत होता. त्या वेदनेतून दलित साहित्य पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून दलित लेखकांनी लेखनाला सुरूवात केली. गावकुसाबाहेरील वास्तव दलित साहित्यामध्ये येऊ लागले. अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, अनिष्ट प्रथा, दुःख, दारिद्र्य, अन्याय – अत्याचार इत्यादीसंबंधी चित्रण दलित साहित्यिकांनी कथा, कादंबरी, कविता, नाटक ह्या वाङ्मयप्रकारातून केले. १९६० नंतर दलित साहित्य आपले स्वरूप स्पष्टपणे दाखवू लागले. त्या संदर्भात डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, ''कथा, कांदबरी, नाटक इत्यादी कथात्म साहित्यात 'कथा' (Story) असते. एखादे साध्य गाठण्यासाठी दोन विरोधी शक्तींचा संघर्ष अथवा झगडा (Struggle) चालू असतो. त्या संदर्भात गुंतलेल्या व्यक्तींची साध्याकडे जाण्याची धडपड चालू असते. लक्ष्याप्रत जाण्याचा आटोकाट प्रयत्न चालू असतो. त्या संघर्षाचे, झगडण्याचे वा धडपडण्याचे (Struggle) सादरीकरण (Presentation) म्हणजे कथात्म साहित्यातील कथा. दलित जीवनाची अशी कथा दलित साहित्यातून प्रकट होऊ लागली''[१] दलित साहित्याचे व्यापक स्वरूप पहात असता डॉ. कऱ्हाडेंच्या विधानाची सत्यता आढळते.

देवदासी संकल्पनेमध्ये जोगतिणीचा अंतर्भाव केला असते. त्यानंतर तिला विवाह करता येत नाही. अविवाहित राहून ती देवीची सेवा करते. ''जोगवा मागणारी स्त्री योगेश्वरी (यल्लम्मा) देवीची किंवा कर्नाटकातील समजुतीप्रमाणे परशुराममाता हिची भक्तीण''[२] असे जोगतिणीच्या संदर्भात म्हटले आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि इतर काही राज्यांमध्ये यल्लमादेवीचे भक्त आहेत. कर्नाटक राज्यामधील सौंदती (जि. बेळगांव) ह्या गावामध्ये यल्लम्मादेवीचे मोठे मंदिर आहे. येथे देवीला मुली वाहण्याचा कार्यक्रम होत होता. आज तेथे कायद्याने बंदी असली तरी पुजाऱ्याच्या घरी किंवा इतरत्र मुली वाहिल्या जाऊन अनिष्ट प्रथा जिवंत ठेवण्याचे काम केले जाते.

देवीवर भक्तांची श्रध्दा असल्यामुळे अनेक लोक सौंदतीला जाऊन कौटुंबिक अडचणीसंबंधी देवीला नवस बोलतात. नवस पूर्ण झाल्यानंतर कुटूंबामध्ये सर्वात मोठे असणारे अपत्य देवीला वाहिले जाते. मुलगा असेल तर तो जोगता आणिी मुलगी असेल तर जोगतीण म्हणून वावरते. अनेक भक्त अज्ञानी, निरक्षर असतात. देवीला मुलगी वाहणे हा निर्णय त्यांनी अज्ञानातून घेतलेला असतो. जोगतिणी ह्या प्रामुख्याने दलित वर्गातील असतात. त्या देवीच्या नावावर जोगवा मागत गावोगावी फिरतात. 'जोगतीण देवीची मालकी गावाची'



PRINCIPAL
Shivaraj College of Arts, Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)

ह्या रूढ झालेल्या म्हणीप्रमाणे गावातील अनेक लोक त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवतात. त्यासाठी अनेक प्रलोभने दाखविली जातात. प्रसंगी बलात्कार अन्याय – अत्याचाराला त्या बळी पडतात. बहुतांशी पुढे त्या वेशाव्यवसाय करतात.

अशा अनिष्ट प्रथेतून स्त्रियांची सुटका व्हावी म्हणून अनेक समाजसुधारक प्रयत्न करीत होते. त्यासाठी अनेक चळवळी झाल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जोगतिणीच्या प्रथेची दाहता माहीत असल्यामुळे देवदासी प्रभावक्षेत्रातील निपाणी, (जि. बेळगांव) येथे १९२५ साली देवदासी परिषद घेऊन त्यांनी प्रथानिर्मूलनाची मागणी केली होती.''[३] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ही चळवळ पुढे चालूच राहिली. जोगतिणी कालांतराने वेश्याव्यवसाय करतात. त्यांच्या प्रबोधनासाठी १६ जून १९६६ रोजी मुंबईतील दामोदर हॉलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबडकर यांनी सभा घेतली होती. आपल्या भाषणात त्यांना उद्देशून म्हणाले होते, ''धर्माच्या नावाने अनैतिक रीतीने आपला निर्वाह करणाऱ्या तुम्ही स्त्रिया आहात. तुमचा स्वाभिमान लुप्त झाला आहे. देहविक्रय करून पोट भरणे हेच ज्याचे जीवनवर्चस्व आहे अशा वर्गाने जगात काय चालले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी. आपला चरित्रक्रम सुधारण्याची तयारी करावी.''[४] अनिष्ट प्रथेतून बाहेर पडून स्वतःचा विकास करावा हे डॉ. आंबेडकरांनी सूचित केले आहे.

दलितेतर आणि दलितांतील अनेक लेखकांनी जोगतिणी संदर्भात कथा–कादंबरीतून लेखन करून जोगतिणीच्या अनिष्ट प्रथेसंदर्भात जनजागृती केली आहे. सीमाभागातील साहित्यिक म्हणून बळवंत कोबळे (ऐनापूर, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) ह्यांचा लौकिक आहे. त्यांनी कथा आणि कवितेबरोबरच कादंबरीलेखन केले. सीमाभागातील दलितांच्या अनेक समस्यांचा आढावा साहित्यातून घेतला आहे. दलित स्त्रीवर अन्याय अत्याचार होत आसल्यामुळे कादंबरीतून त्यांनी अनिष्ट प्रथेसंबंधी वाचा फोडली आहे. 'नापत' (१९८४) आणि 'जोगव्याचे दिवस' (१९९३) ह्या दोन कादंबऱ्यामधून त्यांनी जोगतिणीचे चित्रण केले आहे.

बळवंत कांबळेंची जोगतिणीच्या अनिष्ट प्रथेबद्दल प्रबोधन करणारी 'नापत' (१९८४) ही पहिली कादंबरी आहे. ह्या कादंबरीमध्ये कुशाप्पा हा सर्वसाधारण शेतमजूर, त्याची मुलगी पारू आणि रावसाहेब इनामदार ह्या तीन प्रमुख व्यक्तीचित्रणाच्या माध्यमातून जोगतिणीच्या अनिष्ट प्रथेवर कादंबरीकाराने प्रकाश टाकला आहे. बळवंत कांबळे हे स्वतः जोगतिणीच्या कुटूंबातील सदस्य आहेत. त्यामुळे त्यांच्या कादंबरीमध्ये वास्तववादी चित्रण आहे.

घराण्यामध्ये जोगतीण सोडण्याची परंपरा असल्यामुळे कुशाप्पा स्वतःच्या मुलीस – पारूला जोगतीण म्हणून सोडतो. रावसाहेब इनामदाराचे यल्लम्मा हे दैवत असते. डोंगराला जाताना गाडीसमोर जोगतीण असावी म्हणून रावसाहेब इनामदार कुशाप्पाची हरकत नसल्यामुळे पारूला नवीन लुगडे देऊन तिला डोंगराला घेऊन जातो. तेव्हापासून पारू त्याच्या प्रेमात पडते, मजुरीसाठी त्याच्या शेतात जाते. मात्र पारूचे हे कृत्य सर्वांच्या निदर्शनास येते. कादंबरीकार त्याबद्दल निवेदन करतो, ''डोंगराला आल्याधरनं पारूचं मन कशातच रमत नव्हतं. गोठ्यातनं नवथर वासरू भाईर पडावं, कानात वारं गेलं की त्येनं सैरावैरा करावं, तसंच अगदी

तिच्याबाबत घडत व्हतं.'' (पृ.१२) पारूच्या मनोवस्थेचे असे चित्रण करून कादंबरीकार पारू व इनामदार ह्यांच्या संबंधाची माहिती देतो.

कुशाप्पा हा निरक्षर असला तरी ती विचारी असतो. पारू आणि इनामदाराच्या संबंधाची त्याला माहिती समजते तेव्हा कुणातरी महाराचा मुलगा बघून 'झुलवा' लावून द्यावा असे त्याला वाटते. पारू त्याचे ऐकत नाही तेव्हा तिला तो म्हणतो,''आता घराला आग लावाय चाल्लीय जगात कोण जोगत्या नाईत व्हय? तुलाच जोगतेपणाचा आळ आलाय'' (पृ.४८) कुशाप्पाच्या घराण्यात जोगतिणींची परंपराच असते, मात्र त्या स्त्रिया पतीव्रता स्त्रीप्रमाणे राहिलेल्या असतात. पारूचे वागणे कुशाप्पाला आवडत नसल्यामुळे रागाने तो बहिणीच्या गावी जातो.

कुशाप्पा गेल्यामुळे पारू आणि इनामदाराला चांगली संधी मिळते. इनामदार तिच्याशी प्रमाचे नाटक करतो. मात्र तो तिच्याकडे फक्त भोगदासी म्हणूनच पहात असतो. तो तिला म्हणतो ''तू धरकानं यल्लम्माची जोगती हाईस. तुझ्या संगट कोण बी यवार करील. त्याला तुझ्या बाची आडकाठी का असावी? (पृ.४१) या विधानातून इनामदाराचा जोगतिणी विषयीचा दृष्टीकोन कादंबरीकाराने स्पष्ट केला आहे. पारू जोगतीण असली तरी तिची स्त्रीसुलभ भावना व्यक्त होते. इनामदारावर ती मन:पूर्वक प्रेम करत असते. ती म्हणते, ''मला बी वाटतंय च्यारचौगीसारखं आपलं बी लगीन व्हावं, एकदोन मुलंबाळं व्हावीत, त्येंचा बा असावा.'' (पृ. ४४) पारूच्या ह्या विधानातून तिची सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे राहण्याची इच्छा असते. म्हणूनच ती इनामदारावर प्रेम करते. मात्र ती फसते. त्याच्यापासून तिला दिवस जातात. तिला मुलगा होतो. मात्र इनामदार मुलाची जाबाबदारी टाळतो. उलट तो कुशाप्पाला म्हणतो, ''सतराजणासंगट पोरीला पाठवून पोरीच्या गांडीची नी आपल्या पोटाची खाज थंड करायची सवय तुमास्नी लागलीया. त्येच्या भनं जातच हलकट.'' (पृ.७९) एक जोगतीण आणि तीही दलित म्हटल्यावर तिच्याबद्दल प्रेम वाटणे असंभव असते. परंतू पारू फसते.

पारू एक परिवर्तनशील स्त्री आहे. स्वत:ची झालेली फसवणूक तिला समजते. तिच्या घराण्यात जोगतिणीची प्रथा असल्यामुळेच तिला ही जोगतीण म्हणून सोडलेले असते. यल्लम्मादेवीमुळे आपले आयुष्य उद्ध्वस्त झाले. ह्याची जाणीव पारूला होते. ती म्हणते, ''त्या रांडंच्या नादाला लावून मला ठेवलास नी माझ्या जलमाचं वाटोळं झालं, आता मीनं कुणाच्या नावाजीवानं रडायचं सांग की.'' (पृ.१०४) किंवा यल्लम्मादेवीला उद्देशून ती म्हणते,''ही मुलकाची जगझवी. आमचं काय तरी सळ्ळं करील म्हटलं तर तीबी असल्याच कुत्र्यांच्या मागं आस्तीया. आमी यवढं करून सगळं इनारतकी. मग ह्या नासक्या भेंडीला घरात ठिवून तरी काय फायदा सांग की?'' (पृ.१०४) अशा शब्दामध्ये पारू देवीवर अविश्वास व्यक्त करते. कादंबरीकार बळवंत कांबळेंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा परिवर्तनवादी विचार स्पष्ट केला आहे. देवधर्मामुळेच गुलामी येऊन जीवन उद्ध्वस्त झाले असे पारूला वाटल्यामुळे ती देवाची जग फेकून देते आणि इनामदार बापलेकांनी फसवणूक केल्यामुळे त्यांना कोर्टात खेचते. एकूणच अनिष्ट प्रथेतून पारू बाहेर पडलेली आढळते.

'नापत' ह्या कादंबरीनंतर बळवंत कांबळेंनी 'जोगव्याचे दिवस' (१९९३) ही आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिली. त्याही कादंबरीमध्ये त्यांनी जोगतिणीच्या व्यथा मांडल्या आहेत. ह्या कादंबरीला वास्तवाचा आधार आहे. बळवंत कांबळे देवदासी प्रभक्षेत्रातील तर आहेतच पण जोगतिणीच्या घराण्यामध्ये त्यांचा जन्म झालेला असल्यामुळे कादंबरीतील घटना प्रसंगांमध्ये जिवंतपणा आहे. यल्लम्मादेवीची भीती लोकांमध्ये असते. त्यासंदर्भात कांबळे म्हणतात,''देवदासी प्रथेचा इतका प्रचंड धाक होता की, आई यल्लूबाईच्या विरोधात जाऊन ह्या प्रथेला तडा देण्याचं गावठी धाडस कोणीच करत नसत, म्हणून तर माझी आजी आमच्या घराण्यात रेणुकेच्या नावाने सडणारी पाचवी पिढी!''[५] बहुतांशी यल्लम्मादेवीच्या वाटणाऱ्या भितीमुळे अपशब्द बोलला जात नाही. आर्थिक विवंचना असली तरी नवस फेडले जाते किंवा अपत्य वाहिले जाते हे वास्तवच आहे.

बळवंत कांबळे ह्या घराण्यामध्ये गंगा नावाची स्त्री ही शेवटची जोगतीण ठरते. कांबळेंची ती आजी होती. त्यानंतर त्या कुटुंबमध्ये जोगतिणीची अनिष्ट प्रथा खंडित होते. कांदबरीकाराने गंगाच्या आईपासून म्हणजेच साळवापासून जोगतिणीची माहिती नोंदली आहे. वडील किसन आपण स्वतः बाळशा अशा दोघांचे चरित्र सांगत. कादंबरीकार जोगतिणीची कथा सांगतो. गंगाला जना, किसन आणि यलू ही अपत्ये असतात. केवळ जोगतिणीच्या वंशाला दिवा झाल्यामुळे किसनच्या अंगाला भाऊबंदकीतील लोक चेचलेला बिबा थापतात. जोगतिणीचा वंश वाढू नये ह्यासाठी हे समाजविघातक कृत्य केले जाते. जोगतिणीवर देवीचा प्रभाव असल्यामुळे किसनचा जन्म म्हणजेच 'डोंगराच्या आईनं दिलेला दिवा' असे समजते व लिंब नेसून नवस फेडते.

गंगू ही जोगतीण असल्यामुळे तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण चांगला नसतो. भाऊबंदकी संघर्ष करत असल्यामुळे ती सरंबळवाडी सोडून ऐनापूरला कायमची रहवायास जाते. तेथेही तिला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. मुलांची लग्ने करताना अनेक अडचणींना ती सामोरे जाते. जनाचे लग्न होते, मात्र जोगतिणीचा मुलगा म्हणून किसनला कोणीही मुलगी देत नाही. किसनला तो अपमान वाटतो. लग्नासंबंधी संतूमामाला तो म्हणतो, ''मामा, आईच्या जोगतीपणानं साऱ्या नशिबावर पाणी फिरीवलयं. कोण आपल्या पोटचा गोळा ह्या नरकात ढकलील तूच सांगण'' (पृ.५७) कादंबरीकार किसनच्या माध्यमातून सामाजिक शोकांतिका सांगतो. जोगतिणीच्या मुलामुलींची लग्ने होण्यास अनेक अडथळे येतात. मात्र संतूमामाच्या प्रयत्नामुळे किसनचे लग्न ठरते. बळवंत कांबळेंचे भाष्य असे आहे, ''एक जोगतीच्या पोराला मुलगी मिळावी याचं भाग्य माझ्यासारखं दुसरं कुणाचंच नसावं असे वाटलं, आईला तर आभाळाला हात लावल्यासारखं वाटलं.'' (पृ.६३) कादंबरीतील हा प्रसंग अत्यंत वास्तव आहे.

गंगा जोगतीण ही भाबडी आणि श्रध्दावान स्त्री असते. यल्लम्मा देवीवर तिचा विश्वास असतो. किसन मुंबईला आणि चांगल्या माणसात वावरत असल्यामुळे संतोबा गंगास जोगवा मागण्यास परावृत्त करतो. मात्र गंगा जोगवा मागणे बंद केले तर देवी घरादाराची राखरांगोळी करेल ह्याची तिला भीती वाटते. केवळ देवतेचा प्रभाव असल्यामुळे गंगा त्यासाठी तयार होत नाही.

कादंबरीच्या शेवटी बळवंत कांबळे जोगतिणीच्या प्रथेसंदर्भात म्हणतात, ''मी फेकून देतो माझ्या गळ्यात अडकविलेली कवड्याची माळ. टाकतो पुसुन अनादी काळापासून माझ्या कपाळाची मक्तेदारी घेतलेला भंडारा.'' (पृ.१३९) प्राचीन काळापासून स्त्रीला गुलामीत जखडून टाकणारी अनिष्ट प्रथा येथेच खंडित होते. पुढे कादंबरीकार विचार स्पष्ट करतो. ते म्हणतात,''ते सांगतोहत मला ही माती, ही घरेदारे आणि आभाळात, तळपणारा सूर्य तुझाच आहे म्हणून, माझा तर विश्वासच बसत नाहीय या दगलबाजांवर. पण मला जागवणारी, जगवणारी लेखणीच समर्थपणे मला माझ्या आयुष्याची ग्वाही देतेय जवळिकतेचे. माझ्याच मायभूमीत विरलेले माझे नाव कोरले जातेय. सनातन्यांच्या माळावरआता मला कोण म्हणेल जोगती पोटचा? कोण ठरवेल उपलानी? मी मात्र विसरत चाललोय जोगव्याचे दिवस आणि माझ्यात उगवतेय एक निळी पहाट'' (पृ.१३९) 'निळी पहाट' ह्या विशेषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार स्पष्ट होतो. एका जोगतिणीच्या कुटूंबात निळी पहाट होते. जोगतिणीच्या प्रथेला तिलांजली मिळते. शिक्षण आणि संस्कार ह्यामुळे परिवर्तन होऊन नव्या जीवनाला सुरूवात होते. 'जोगव्याचे दिवस' ह्या कादंबरी बद्दल समीक्षक डॉ. मदन कुलकर्णी, म्हणतात, ''गंगाआईच्या सरळ रेखेवर दोन टोकांचे दोन बिंदू म्हणजे किसन आणि बाळशा. ह्या दोन बिंदूमध्ये हे जीवन हेलकावे खात होते. परिवर्तनाची प्रेरणा मिळालेला मुलगा आणि परिस्थितीची जाणीव असलेला बाळशा उर्फ बळवंत ह्या नायकाव्दारे ही कादंबरी जीवनातील खुणा दर्शविते.''[६] एकुण बळवंत कांबळे ह्यांनी 'नापत' आणि 'जोगव्याचे दिवस' ह्या दोन कादंबऱ्यातून परिवर्तनवादी विचार मांडले आहेत. अनिष्ट प्रथेसंबंधी लेखन करून बळवंत कांबळेंनी सामाजिक प्रबोधन करून आपल्या कलाकृतीव्दारे एकूणच मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घातली आहे.

**संदर्भसूची**

१. कऱ्हाडे सदा — 'दलित साहित्य चिकित्सा', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, व्दि.आ. २००७, पृ. ५२
२. दाते—कर्वे — 'महाराष्ट्र शब्दकोश', खंड ३, वरदा बुक्स, पुणे, १९३५, पृ. १३२८
३. पाटील लीला — 'भारतीय समाजजीवन', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९०, पृ.७८.
४. खेरमोडे चांगदेव भवानराव — 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर' खंड ६, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८५, पृ.१३१.
५. कांबळे बळवंत — 'स्वगत', ललित, मुंबई, जानेवारी १९९९, पृ.२१
६. कुलकर्णी मदन — 'देवदासी यल्लम्माच्या जोगतिणी' विजय प्रकाशन, नागपूर, १९९४ पृ. १६८.

साधनसूची

१. कांबळे बळवंत —'नापत' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९८४.
२. कांबळे बळवंत—'जोगव्याचे दिवस', प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर १९९३